टर्की पालन : महिलांसाठी पर्यायी उपजीविकेची संधी

Sarbaswarup Ghosh and Narayan Chandra Sahu

'दक्षिण परगणा जिल्ह्यातील महिलांनी टर्की पालनाची जबाबदारी आत्मविश्वासाने आणि यशस्वीरित्या स्वीकारली आहे. स्थानिक कृषी विज्ञान केंद्राच्या (KVK) सक्रिय प्रोत्साहनामुळे महिलांच्या विकासात अडथळे ठरणाऱ्या अनेक गोष्टींवर मात करता आली असून, या उपक्रमामुळे महिला गटांची क्षमता प्रभावीपणे समोर आली आहे.'



अझोला तयार केला जातो आणि टर्की पक्षांना खायला दिला जातो.

(अझोला तयार केला जातो आणि टर्की पक्षांना खायला दिला जातो.)

भारतीय कुक्कुटपालन क्षेत्रात दरवर्षी सुमारे ८ टक्क्यांनी वाढ होताना दिसते, यामागे कोंबडीच्या मांस व अंड्यांची वाढती मागणी, एकात्मिक मूल्य साखळीचा विस्तार, तसेच संशोधन आणि नवनवीन उपक्रमांचे योगदान हे प्रमुख घटक आहेत (तूर आणि गोयल, २०२२). गेल्या काही दशकांत या क्षेत्राने पारंपरिक परसातील कुक्कुटपालनापेक्षा अधिक व्यावसायिक दृष्टिकोन स्वीकारला आहे. मात्र, परसातील लहान कळपांमध्ये कुक्कुटपालन करणारे अल्पभूधारक व अत्यल्पभूधारक शेतकरी, विशेषतः महिला, अद्यापही या व्यावसायिक बदलांच्या प्रवाहापासून बऱ्याच अंशी दूर आहेत. त्यांच्याकडे या क्षेत्रात उतरण्यासाठी आवश्यक आर्थिक साधनसामग्री किंवा तांत्रिक कौशल्य अजूनही उपलब्ध नाही.

ही गरज लक्षात घेऊन, २०१६ मध्ये कोलकाता येथील दक्षिण २४ परगणा जिल्ह्यात सस्य श्यामला कृषी विज्ञान केंद्राने (एसएस केव्हीके) महिलांसाठी पर्यायी उपजीविकेचा मार्ग म्हणून परसातील टर्की (मेलेग्रिस गॅलोपावो) पालनाला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न हाती घेतला. या उपक्रमामागे अनेक समजूतदार कारणे होती. टर्की पक्षी तुलनेने कमी खर्चात वाढवता येतात आणि त्यांना ब्रॉयलर पक्ष्यांप्रमाणे अनेक गंभीर आजारांचा धोका कमी असतो. शिवाय, टर्कीचे मांस शहरी ग्राहकांमध्ये त्याच्या खास चव, सुगंध आणि पोषणमूल्यामुळे अधिक पसंतीस उतरत आहे. अभ्यासामध्येही हे दिसून आले की ब्रॉयलर मांसाच्या तुलनेत (१४० किलोकॅलरी/८५ ग्रॅम) टर्की मांसात तुलनेने कमी कॅलरीज (१२५ किलोकॅलरी/८५ ग्रॅम) असल्यामुळे आरोग्यसचेत ग्राहकांसाठी ते एक अधिक योग्य पर्याय ठरते. या सर्व बाबींचा विचार करता, कोलकाता शहर हे टर्की मांसासाठी उपयुक्त बाजारपेठ ठरू शकते, असा ठाम विश्वास निर्माण झाला आहे.

'टर्की पालन कार्यक्रम स्वीकारण्यासाठी महिला गटांचे संघटन आणि एकत्रीकरण'

पूर्वी काही महिला शेतकरी त्यांच्या कुटुंबासाठी अतिरिक्त उत्पन्न मिळवण्यासाठी घरगुती स्तरावर देशी कुक्कुटपालन करत असत. त्या मुख्यतः लहान कळपांमध्ये कुरोइलर आणि आरआयआर या सुधारित जातींच्या कोंबड्या पाळत होत्या. मात्र, कालांतराने पारंपरिक कुक्कुटपालनातील त्यांची रुची तीन ठोस कारणांमुळे कमी होऊ लागली: ग) ब्रॉयलर कुक्कुटपालनाच्या तुलनेत कमी आर्थिक परतावा, गग) शाश्वत व व्यवहार्य बाजारपेठेचा अभाव, त्यामुळे अंडी व पक्ष्यांची विक्री प्रामुख्याने मध्यस्थांमार्फतच करावी लागणे, आणि गगग) पक्ष्यांमध्ये आढळणारा उच्च मृत्युदर.

जेव्हा या महिलांशी टर्की पालनासारख्या पर्यायी उपजीविकेच्या संधीबाबत संवाद साधण्यात आला, तेव्हा त्यांनी मोठ्या उत्साहाने या उपक्रमात सहभागी होण्याची तयारी दर्शवली. परिणामी, दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील सोनारपूर, बरुईपूर आणि बजबज घ्घ या तीन तालुक्यांतील सुमारे पंधरा स्वयं-सहायता गटांमधील महिलांची टर्की पालनासाठी निवड करण्यात आली.

या महिलांना सुरुवातीला टर्की पालनाचे सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले. त्यांना राज्य शासनाच्या मदतीने सुरु असलेल्या एका मध्यम आकाराच्या टर्की प्रजनन केंद्राची माहिती पुरवण्यात आली. बेल्ट्सविले स्मॉल व्हाईट या टर्की जातीचा आधार घेऊन वैज्ञानिक पद्धतीने टर्की पालनाची प्रात्यक्षिके शेतकऱ्यांच्या बांधावर वेळोवेळी घेण्यात आली. या कृतींमुळे महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आणि टर्की पालनासाठी आवश्यक तांत्रिक बाबी व शिफारसी जनमानसात पोहोचू लागल्या. परसातील टर्की पालनासाठी तयार करण्यात आलेली वैज्ञानिक मार्गदर्शिका मुख्यतः निवास व्यवस्थापन, संतुलित आहार आणि काटेकोर प्रतिबंधात्मक आरोग्य व्यवस्थापन यांवर आधारित होती. सामान्यतः घरगुती व्यवस्थापनात टर्की पक्षी पाच महिन्यांत अंदाजे पाच किलो वजन गाठतो आणि त्यानंतर विक्रीसाठी योग्य ठरतो.

मोठ्या प्रमाणावर अंगीकरण

या उपक्रमाला खऱ्या अर्थाने यश मिळाले, जेव्हा कृषी विज्ञान केंद्राने (KVK) पश्चिम बंगाल सरकारच्या उपकंपनी असलेल्या पश्चिम बंगाल पशुधन विकास महामंडळा (WBLDC) सोबत करार केला. या कराराअंतर्गत महिला स्वयं-सहायता गटांतील सदस्यांनी पाळलेले टर्की पक्षी अधिकृतपणे बाजारात विक्रीसाठी पाठवण्याची व्यवस्था उभी करण्यात आली. कराराच्या अंमलबजावणीतॅथ्अ ने थेट महिला शेतकऱ्यांच्या घरी जाऊन जिवंत टर्की पक्ष्यांचे संकलन सुरू केले. या टप्प्यावर फार्म गेट दर सरासरी प्रति किलो २७० रुपये निश्चित करण्यात आला, जो व्यावसायिक ब्रॉयलर पक्ष्यांच्या तुलनेत लक्षणीयरीत्या अधिक होता. ही रक्कम WBLDC मार्फत थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते.

प्रत्येक संगोपन चक्रामध्ये, सुमारे २० पक्ष्यांच्या कळपावर आधारित उत्पादन घेणाऱ्या टर्की उत्पादक महिलेला अंदाजे १५,००० ते २०,००० रुपयांचे निव्वळ उत्पन्न मिळते. विशेष म्हणजे, टर्की पक्ष्यांच्या आहारासाठी स्थानिक पातळीवर सहज मिळणारे पदार्थ, स्वयंपाकघरातील कचरा आणि अझोला यांचा वापर केल्यास उत्पादन खर्च कमी होतो आणि नफा अधिक वाढतो.

महिला बचत गटांतील सदस्यांकडून संकलित करण्यात आलेले टर्की मांस 'हरिंघाटा मीट' या ब्रँडअंतर्गत, पश्चिम बंगालमधीलॅथ्अ च्या विविध रिटेल काउंटरवर गोठवलेल्या मांसाच्या श्रेणीत विक्रीसाठी ठेवले जाते.

२०१९ पासून टर्की पालनाचा मोठ्या प्रमाणावर स्वीकार होऊ लागला आहे आणि एक सुस्पष्ट, सुव्यवस्थित मॉडेल (आकृती १) तयार करून त्याच्या माध्यमातून याची अंमलबजावणी सुरू आहे. या मॉडेलमध्ये पतसुविधेसाठी वित्तीय संस्थांशी, तांत्रिक सहकार्यासाठी पश्चिम बंगाल सरकारच्या विविध विभागांशी, तसेच विपणनासाठी ॅथ्अ सोबत समन्वय साधण्यात आलेला आहे.

संपूर्ण टर्की पालन व विपणन कार्यक्रमाची रचना व अंमलबजावणी ही केवळ ख्ख्ख मार्फतच करण्यात आली आहे. चालू वर्षात, सुमारे १६० महिला स्वयं-सहायता गटांतील सदस्यांनी टर्की पालनात यशस्वी सहभाग घेतला आहे. अल्पभूधारक व अत्यल्पभूधारक मागासवर्गीय शेतकरी समुदायातील या महिलांनी दर तिमाहीलाॅथ्अ ला सुमारे १.५ टन जिवंत टर्की पक्षी पुरवण्यास सुरुवात केली आहे. टर्की पालनाच्या माध्यमातून त्यांनी केवळ आर्थिक उत्पन्नात वाढ केली नाही, तर ग्रामीण विकासाच्या व्यापक प्रक्रियेमध्ये स्वतःचे योगदानही निश्चित केले आहे. ही उपजीविकेची संधी त्यांच्या दृष्टीने केवळ उत्पन्नाचा पर्यायी स्रोत न राहता, आत्मविश्वास, समाधान, आत्मसन्मान आणि कुटुंबाच्या पोषणासाठी महत्त्वाचा आधार बनली आहे.

या महिला टर्की उत्पादकांच्या प्रेरणादायी यशकथांमुळे, पश्चिम बंगाल सरकारच्या पशुपालन, दुग्ध व्यवसाय व मत्स्य व्यवसाय (ARD) विभागाने २०२३ पासून सोनारपूर ब्लॉकमध्ये या कार्यक्रमाच्या विस्ताराची प्रक्रिया हाती घेतली आहे. विशेष योजनेअंतर्गत ARD




Fig 1: Convergent model of upscaling

विभाग आणि KVK एकत्रितपणे ग्रामीण तरुणांना टर्की पिल्ल्यांचे वितरण करत असून, त्यामुळे शेतकरी कुटुंबांसाठी एक शाश्वत व समृद्ध उपजीविकेची संधी निर्माण होत आहे.

यशाचे घटक

केव्हीकेच्या प्रशिक्षण, प्रात्यक्षिक आणि प्रेरणादायी सत्रांचा शेतकरी समुदायावर लक्षणीय आणि सकारात्मक प्रभाव पडला.या प्रशिक्षण व जनजागृती उपक्रमांमुळे टर्की पालनासाठी आवश्यक असा वैज्ञानिक पाया भक्कमपणे घालण्यात आला. परिणामी, प्रत्येक महिला बचत गट सदस्यामधील सुप्त नेतृत्वगुणांना चालना मिळाली आणि त्यांना स्वतःमध्ये बदल घडवून आणता आला.

केव्हीके, आयसीएआर-आयव्हीआरआय आणि पश्चिम बंगाल सरकारच्या पशु संसाधन विकास विभागाच्या तांत्रिक सहकार्यामुळे, तसेच खात्रीशीर बाजारपेठ उपलब्ध झाल्यामुळे या कार्यक्रमाने अपेक्षित यश मिळवले. विशेष म्हणजे, या विविध घटकांमधील समन्वयामुळे उपक्रमाची अंमलबजावणी अधिक सुलभ आणि प्रभावी झाली.

कोविड-१९ महामारीच्या कठीण काळात, जेव्हा अनेक शेती उपक्रम पूर्णपणे ठप्प झाले होते, तेव्हा या भक्कम विपणन प्रणालीमुळे टर्की पालनाचे कार्य चालू राहिले. पशु संसाधन विकास विभागाने या कार्यक्रमाच्या सुरुवातीपासूनच सक्रिय भूमिका घेतली. टर्की उत्पादकांना गावपातळीवर एक दिवसाच्या पिल्लांचा नियमित पुरवठा, तसेच लसीकरण कार्यक्रमाच्या माध्यमातून सातत्यपूर्ण पाठबळ देण्यात आले. मूल्य साखळीचा शाश्वत कार्यान्वय सुनिश्चित करण्यात या तांत्रिक सहकार्याची भूमिका फारच महत्त्वाची ठरली आहे.

तक्ता क्रमांक १: गृहिणी ते टर्की उद्योजक: श्रीमती नियती मोंडल यांची प्रेरणादायी कहाणी

४१ वर्षीय श्रीमती नियती मोंडल या एक गृहिणी असून आपल्या मुलीच्या शिक्षणासाठी अतिरिक्त उत्पन्न मिळविण्याच्या सतत प्रयत्नात असतात. त्या सोनारपूर ब्लॉकमधील जयकृष्णपूर गावातील 'पुष्प गोष्टी' या महिला स्वयं-सहायता गटाच्या सक्रिय सदस्य आहेत. सुरुवातीला त्यांनी त्यांच्या परसातील लहान कोंबड्यांचे कळप वाढवून थोडेफार उत्पन्न मिळवण्याचा प्रयत्न केला. मात्र, पारंपरिक पद्धतीने चालणाऱ्या कुक्कुटपालनामधून फारच मर्यादित उत्पन्न मिळत असल्यामुळे त्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत होता.

अशा वेळी केव्हीकेच्या प्रशिक्षण सत्रात त्यांना प्रथमच टर्की पालनाची संकल्पना समजली आणि त्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदलांची सुरुवात झाली. एका सहकारी शेतकऱ्याच्या टर्की पालनातील यशाच्या अनुभवाने प्रेरित होऊन त्यांनीदेखील या उपक्रमात सामील होण्याचा निर्णय घेतला.

प्रारंभी केव्हीकेने त्यांना फ्रंटलाइन प्रात्यक्षिकांतर्गत १० टर्की पिल्लांची सुविधा दिली. त्यानंतर त्यांनी हळूहळू टर्की पालनातील व्यवस्थापन, अझोला लागवड, पिल्लांचे लसीकरण आणि नोंदवहीचा वापर अशा संकल्पना आत्मसात केल्या.

सहा महिन्यांत, त्यांनी पारंपरिक कोंबड्यांच्या कळपाऐवजी टर्की पालनावर लक्ष केंद्रित करण्याचा ठाम निर्णय घेतला. ब्रूडिंग, संतुलित आहार, पशुवैद्यकीय सेवा यांसह वैज्ञानिक टर्की पालनाच्या सर्व बाबी त्यांनी समजून घेतल्या आणि प्रत्यक्षात राबवल्या. विशेषतः अझोला लागवड, भाजीपाला कचऱ्याचा उपयोग, जैवसुरक्षा व्यवस्थापन आणि कचऱ्याचा पुनर्वापर यांसारख्या नियोजित गोष्टींमुळे त्यांनी ५० टर्की पक्ष्यांच्या कळपाचे यशस्वी व्यवस्थापन सुरू केले. आपल्या लहान भाजीपाला बागेत टर्की खताचा वापर करून त्यांनी चांगले उत्पादनही मिळवले. या सर्व प्रयत्नांमुळे त्यांना टर्की पालनातून दरवर्षी सरासरी ६०,००० ते ७५,००० इतके निव्वळ उत्पन्न मिळू लागले.त्यांच्या मते, टर्की पालन हे रोगप्रतिकारक क्षमतेमुळे आणि निश्चित बाजारपेठेमुळे पारंपरिक कुक्कुटपालनाच्या तुलनेत अधिक फायदेशीर आहे.

आपल्या अनुभवातून प्रेरणा घेत त्यांनी गावातील इतर महिलांशी संवाद साधण्यास सुरुवात केली आणि त्यांच्या यशामुळे सुमारे ५० महिला शेतकरी टर्की पालन गटात सहभागी झाल्या.

त्यांच्या कामाची पद्धत इतकी परिणामकारक ठरली की त्या गावात एक प्रभावी 'आयकॉन' म्हणून उदयास आल्या—ज्यांनी उपजीविकेचे हे पर्यायी साधन इतर महिलांनाही आत्मसात करायला प्रवृत्त केले. गावातील शेतीची स्थिती आज निश्चितच पूर्वीपेक्षा अधिक सशक्त झाली आहे.

२०२२ मध्ये त्यांनी एका टेलिव्हिजन चर्चासत्रात तज्ज्ञ म्हणून सहभाग घेतला आणि आपले विचार मांडले. २०२३ मध्ये पश्चिम बंगाल सरकारच्या एआरडी विभागाने त्यांना त्यांच्या टर्की पालन क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी 'अचिव्हर फार्मर' म्हणून गौरवले.त्यामुळे अनेक सहकारी शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावले गेले आहे.आता त्या त्यांच्या गटासाठी टर्की पिल्लांची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी एक अंडी उबवणी यंत्र सुरू करण्याच्या तयारीत आहेत. त्याचबरोबर, भविष्यात गावातच एक लघु मांस प्रक्रिया केंद्र सुरू करण्याचाही त्यांचा विचार आहे. आपल्या परसातील छोट्या कोंबड्यांपासून सुरू झालेला त्यांचा प्रवास, आज त्यांचा उत्साह, संघटित दृष्टिकोन आणि दूरदर्शी नियोजनामुळे त्यांना 'सेलिब्रिटी टर्की पालक' या नावाने ओळख मिळवून देतो आहे.

या भागातील महिलांच्या यशस्वी टर्की पालन उपक्रमाला जवळच्या महानगराची सुलभ बाजारपेठ लाभली, कारण येथे टर्की मांसासाठी एक मोठा ग्राहकवर्ग आधीपासूनच अस्तित्वात होता. त्यामुळे उत्पादनासाठी मागणी कायम राहिली आणि महिला बचत गटांच्या कार्यक्षमतेचा उत्तम उपयोग करता आला.या उपक्रमाच्या यशाची दखल स्थानिक प्रिंट व इलेक्ट्रॉनिक माध्यमांनीही घेतली, ज्यामुळे त्याचे सकारात्मक वृत्तांकन व्यापक स्तरावर झाले.



Niyati Mondal transporting Turkey birds for sale

या अनुभवाच्या आधारावर, स्वयं-सहायता गट, शेतकरी क्लब, आणि एफपीओसारख्या अन्य शेतकरी संस्थांना देखील या पर्यायी आणि फायदेशीर उपजीविकेशी जोडता येईल. वैज्ञानिक दृष्टिकोन, सक्षमीकरणाची दिशा आणि सकारात्मक वृत्ती यांचा समन्वय साधून, शेती उत्पन्नाचे विविधीकरण करतानाही हे मॉडेल प्रभावी ठरू शकते.

References

- *Ghosh Sarbaswarup, Narayan Chandra Sahu, and Avijit Haldar. (2023)* ***Status of Backyard Turkey (Meleagris Gallopavo) Production System in South 24 Parganas District of West Bengal, India****. Journal of the Indian Society of Coastal Agricultural Research 41: 1 https://doi.org/10.54894/jiscar.41.1.2023.128933*
- *Ghosh Sarbaswarup and Manidipta Saha. (2023).* ***Growth Performance and Meat Quality of Turkey birds Produced by the Small Holders in South 24 Parganas district of West Bengal India****. Exploratory Animal & Medical Research 13: 2. pp 184-190.*
- *Toor, J.S. and Goel, R. (2022).* ***Poultry Farming in India with Special Reference to Punjab: An Overview****. Agricultural Science Digest. DOI: 10.18805/ag.D-5540 (13) (PDF) Poultry Farming in India with Special Reference to Punjab: An Overview. Available from: https://www.researchgate.net/publication/362220105_Poultry_Farming_in_India_with_Special_Reference_to_Punjab_An_Overview [accessed Feb 10 2024].u*

Sarbaswarup Ghosh
Sasya Shyamala Krishi Vigyan Kendra
Ramakrishna Mission Vivekananda Educational & Research Institute (RKMVERI)
Arapanch, Sonarpur, South 24 Parganas, West Bengal
E-mail: drsarba@rediffmail.com

मराठी अनुवाद : अनिकेत लिखार

Source :*Turkey farming an alternative livelihood opportunity for women, Leisa India, March 2024*